**नि.फौ.ख.नं.३५५/२०२५**
**नि.क्र. ३९**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार – १**

**मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,**
नाव – मारुती निवृत्ती उघडे,
वय–५० वर्षे, धंदा – शेती,
राहणार– राक्षसवाडी बुद्रुक, ता.कर्जत, जि.अहमदनगर.

**साक्षीदार क्र.१ चा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. डी. आर. बाविस्कर यांचेतर्फे शपथेवर सुरु –**

१. घटना दि.२२/०८/२०२१ रोजी सायंकाळी ०५.३० – ०६.०० च्या सुमारास घडली होती. त्यादिवशी हौसराव उर्फ तुकाराम उघडे, संदिप तुकाराम उघडे, अजय तुकाराम उघडे व अरुणाबाई तुकाराम उघडे यांनी माझ्या शेतातील कांदे व मिरची या पिकांमध्ये मेंढरे चरण्यासाठी सोडली होती. मी रानात गेलो त्यावेळी मी माझ्या शेतातील त्यांची मेंढरे बाहेर हुसकावून लावली. त्यानंतर संध्याकाळी मी त्यांना मेंढरे शेतात का सोडले हे विचारण्यासाठी गेलो. मी त्यांना विचारण्यासाठी गेलो असता हौसराव उर्फ तुकाराम उघडे, संदिप तुकाराम उघडे, अजय तुकाराम उघडे व अरुणाबाई तुकाराम उघडे यांनी मला लाथाबुक्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. अजय तुकाराम उघडे याने मला विट फेकून मारली. सदरची विट माझ्या पाठीला उजव्या बाजूला बरगडीवर लागली. सदर घटनेनंतर मी पोलीस ठाणे, कर्जत येथे गेलो. तेथे गेल्यानंतर मी पोलीसांकडे सदर घटनेची तक्रार दिली. आता मला फिर्याद दाखविली त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. (सदर फिर्यादीस **नि.क्र.४०** देण्यात आला). आता मला सदर गुन्हयातील छापील प्रथम खबरी अहवाल दाखविला. त्यावर देखील माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. (सदर प्रथम खबरी अहवालास **नि.क्र.४१** देण्यात आला). सदर घटनेनंतर मला ज्याठिकाणी विट मारली होती तेथे लई (जास्त) दुखत होते. त्यामुळे मी बारामती येथील गायकवाड

हॉस्पीटल येथे गेलो. तेथील डॉक्टरांनी मला तपासले. त्यांनी सिटी स्कॅन केले. त्यामध्ये माझ्या पाठीला उजव्या बाजूकडील दोन बरगड्यांना फ्रॅक्चर असल्याचे डॉक्टरांना दिसले. त्यानुसार डॉक्टरांनी रिपोर्ट दिला. सदर रिपोर्ट मी प्रस्तुत खटल्यात दाखल केलेला आहे. (सहा. सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदाराने स्वतः सदर अहवाल दाखल केल्याचे कथन केले आहे. त्यामुळे त्याला निशाणी देण्यात यावी असे कथन केले. आरोपीच्या विधिज्ञांनी सदर अहवालास प्रस्तुत साक्षीदाराच्या कथनावरुन निशाणी देण्यास हरकत घेतली. उभय पक्षांचा सदर हरकतीच्या अनुषंगाने युक्तीवाद ऐकला. सहा. सरकारी अभियोक्ता यांनी युक्तीवाद केला की, कागदपत्रे शाबीत करणे व त्यास निशाणीकृत करणे या दोन्ही भिन्न बाबी आहेत. सदर अहवालाच्या शाबीतीसाठी अभियोगपक्ष संबंधीत डॉक्टरांची साक्ष नोंदविणार आहे. तथापि, सदर साक्षीदाराने स्वतः सदर अहवाल न्यायालयात दाखल केला आहे व त्याप्रमाणे त्याने कथन देखील केले आहे त्यामुळे त्याला निशाणी देणे गरजेचे आहे. प्रस्तुत खटल्यात अभियोगपक्षाने दस्तऐवज यादी नि.क्र.३६ सोबत सिटी स्कॅनचा अहवाल दाखल केलेला आहे. सदर अहवाल डॉ. शरद प्रविण गायकवाड यांच्या हॉस्पीटल मधून देण्यात आलेला आहे. सदरील अहवाल फिर्यादीच्या तपासणीबाबतचा अहवाल असला तरी केवळ फिर्यादीने सदर दस्त न्यायालयात दाखल केल्याचे कथन केले. या कारणास्तव सदर अहवालास निशाणी देता येणार नाही. त्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी सदर अहवालास निशाणी देण्याबाबत केलेली विनंती नामंजूर करण्यात येत आहे.)

२. मी आरोपींना ओळखतो. आज रोजी आरोपींपैकी आरोपी अजय तुकाराम उघडे न्यायालयात हजर असून अन्य आरोपी न्यायालयात हजर नाहीत. (आरोपी क्र.१, २ व ४ न्यायालयात गैरहजर असून त्यांच्यावतीने **नि.क्र.३८** लगत अर्ज देऊन त्यांच्या गैरहजेरीत पुरावा नोंदविण्यास हरकत नाही असे कथन करण्यात आल्याने त्यांची आजरोजीची गैरहजेरी माफ करण्यात आलेली आहे.)

३. मला ज्या विटेने मारहाण केली ती विट मी ओळखू शकेन. (प्रस्तुत खटलयातील जप्त मुद्देमाल पांढऱ्या रंगाच्या कागदात गुंडाळलेला असून त्यावर लेबल

लावलेले आहे. सदर मुद्देमाल आरोपींच्या विधिज्ञांच्या समक्ष न्यायालयात उघडून साक्षीदारास दाखविण्यात आला.) आता मला दाखविलेला विटेचा तुकडा मला फेकून मारला त्यामुळे मला दुखापत झाली होती. सदर विटेच्या तुकड्यास **आर्टिकल अ** देण्यात आले.

**सरतपास पुर्ण.**

**<u>आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. एन. एस. खरात यांच्यामार्फत सदर साक्षीदारचा उलटतपास सुरु.</u>**

४. मी त्यादिवशी सायंकाळी ०५.०० – ०५.३० च्या दरम्यान माझ्या शेतात गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर आरोपींची व माझी भेट झाली नव्हती. माझे शिक्षण इयत्ता १० वी पर्यंत झालेले आहे. सदरचे भांडण माझ्या घरासमोर झाले होते. सदरचे भांडण माझ्या घरासमोर झाल्याचे मी पोलीसांना सांगितले होते. आता मला फिर्याद दाखविली त्यात सदर भांडण माझ्या घरासमोर झाले असा मजकूर नमुद नाही. पोलीसांनी सदर मजकूर माझ्या जबाबात न लिहिल्याचे कारण मला सांगता येणार नाही. साक्षीदार सांगतो की, आरोपी व आम्ही एकमेकांच्या समोर राहतो. मी सदर घटनेबाबत दि.२२/०८/२०२१ रोजी सायंकाळी तक्रार दिली होती. माझ्या पोलीसांशी कोणतेही वाद नव्हते. मी माझ्या सरतपासात घटनेबाबत केलेले कथन दि.२२/०८/२०२१ रोजी तक्रार देतेवेळी पोलीसांना सांगितले होते. मी पोलीस ठाण्यात गेल्यानंतर पोलीसांनी मला उपचारासाठी दवाखान्यात पाठविले नव्हते. मला वैद्यकीय उपचारासाठी दवाखान्यात जायचे आहे असे मी देखील पोलीसांना म्हणालो नव्हतो. साक्षीदार सांगतो की, मी स्वतःहून दि.२२/०८/२०२१ रोजी सरकारी दवाखाना, कर्जत येथे गेलो होतो. तेथील डॉक्टरांना मी मला मारहाण झाल्याचे सांगितले होते. त्यावेळी डॉक्टरांनी मला बघितले व तुम्हाला काही झाले नाही असे सांगितले. मी गायकवाड हॉस्पीटल येथून माझे दुखापतीचे प्रमाणपत्र घेतलेले नाही. साक्षीदार सांगतो की, तेथून मला सिटी स्कॅनचा रिपोर्ट देण्यात आला. तेथे उपचार घेतल्याचे कागदपत्र माझ्याकडे आहेत. मी गायकवाड हॉस्पीटल येथे ॲडमीट झालेलो नव्हतो. मी बारामती येथील गायकवाड हॉस्पीटल येथे केवळ सिटी स्कॅन केले व पुढील उपचार भिगवन येथील दवाखान्यात उपचार घेतले. त्यानंतर मी पुन्हा पोलीस ठाण्यात दि.२५/०८/२०२१ रोजी गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, मला

फ्रॅक्चर झाल्याचे डॉक्टरांनी निदान केल्यानंतर त्याबाबत मी कोणत्याही दवाखान्यात ॲडमीट झालेलो नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, मला गायकवाड हॉस्पीटलमध्ये सिटी स्कॅन केलेल्या डॉक्टरांचे नाव व मशिनचे याबाबत मला सांगता येणार नाही.

५. हे म्हणणे खरे दि.२२/०८/२०२१ रोजी पोलीसांनी माझ्या तक्रारीवरुन गुन्हा दाखल केला नाही म्हणून मी दि.२५/०८/२०२१ रोजी पुन्हा सिटी स्कॅनचा अहवाल घेऊन पोलीसांकडे गेलो होतो. मी माझी साक्ष दि.२५/०८/२०२१ रोजीच्या फिर्यादीच्या अनुषंगाने देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दि.२२/०८/२०२१ रोजीच्या घटनेच्या अनुषंगाने न्यायालयात साक्ष देत नाही. हे म्हणणे खरे  आहे की, राक्षसवाडी ते कर्जत हे अंतर साधारण २०–२५ कि.मी. आहे. दि.२२/०८/२०२१ रोजी मी रात्री ०९.०० च्या सुमारास पोलीस ठाण्यात कर्जत येथे आलो होतो. घटनेनंतर मी आमच्या गावातील खाजगी दवाखान्यात उपचाराकरीता गेलो होतो. तेथील डॉक्टरांनी मला इंजेक्शन व गोळ्या–औषधे दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, राक्षसवाडीहून कर्जतला कुळधरणमार्गे यावे लागते. हे म्हणणे खरे आहे की, मौजे कुळधरण येथे सरकारी दवाखाना व दोन–तीन खाजगी दवाखाने आहेत. मी कर्जत येथे येत असताना कुळधरण येथे सरकारी दवाखाना अथवा खाजगी दवाखाना येथे उपचाराकरीता गेलो नव्हतो. मी तक्रार देतेवेळी गावातील खाजगी दवाखान्यात उपचार घेतले हे पोलीसांना सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासात सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नव्हती म्हणून मी पोलीसांना घटनेनंतर गावातच उपचार घेतल्याचे सांगितले नव्हते.

६. दि.२५/०८/२०२१ रोजी तक्रार देतेवेळी मी पोलीसांना सरकारी दवाखान्यात उपचारासाठी गेलो होतो असे पोलीसांना सांगितले नव्हते. मी बारामती येथील दवाखान्यात सिटी स्कॅन करून आलो होतो त्यामुळे पोलीसांना दि.२२/०८/२०२१ रोजी सरकारी दवाखान्यात गेलो होतो असे सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी साक्षीदारांचे जबाब माझ्या सांगण्याप्रमाणे घेतले होते. हे म्हणणे खरे आहे की, दत्तात्रय लांभोर हा माझा सख्खा भाचा असून गणेश ज्ञानदेव उघडे व आबा ज्ञानदेव उघडे हे माझे सख्खे पुतणे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, साक्षीदार मिनाक्षी लांभोर ही माझी

पुतणी आहे. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्यासाठी दत्तात्रय व गणेश यांना मी स्वतः बोलविले होते. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही ज्यावस्तीवर राहतो त्या वस्तीला श्रीराम वस्ती म्हणून ओळखतात. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या वस्तीवर साधारण १०० – १५० लोक राहतात. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या वस्तीवर माझे कुणाशीही वाद नाही.

७. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझ्या शेतात मेंढ्या चारण्यासाठी सोडल्या व मी त्यांना विचारण्यासाठी गेलो असता त्यांनी मला लाथाबुक्यांनी मारहाण केली हे मी खोटे कथन करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी अजय याने मला विट फेकून मारली व सदर विट माझ्या उजव्या बाजूकडील बरगड्यांना लागली हे मी खोटे कथन करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनेनंतर मला त्रास होत असल्याने मी बारामती येथील गायकवाड हॉस्पीटलमध्ये जाऊन सिटी स्कॅन केले हे मी खोटे कथन करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, तेथील डॉक्टरांनी माझा सिटी स्कॅन केले व माझ्या उजव्या बाजूकडील दोन बरगड्यांना फ्रॅक्चर झाल्याचे सांगितले हे मी खोटे कथन करीत आहे.

८. हे म्हणणे खरे आहे की, दि.२२/०८/२०२१ रोजी पोलीसांनी माझ्या तक्रारीवरुन गुन्हा दाखल केला नाही म्हणून मी पोलीसांविरुध्द कुठेही तक्रार केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, दि.२२/०८/२०२१ रोजी पोलीसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे माझी तक्रार नोंदवून घेतली होती म्हणून मी पोलीसांविरुध्द कुठेही तक्रार केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या सरतपासात कथन केलेल्या घटनेच्या अगोदरपासून आरोपी व माझ्यात वाद होते. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या अगोदरपासून आम्ही एकमेकांशी बोलत नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, दि.२५/०८/२०२१ रोजी पोलीसांकडे तक्रार देण्यासाठी मला कोणतेही कारण घडले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, केवळ आरोपींना त्रास देण्याच्या हेतूने दि.२५/०८/२०२१ रोजी पोलीसांकडे खोट्या मजकूराची तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, मला कोणतीही मारहाण झालेली नसताना मी खाजगी डॉक्टरांना हाताशी धरुन खोटा सिटी स्कॅनचा अहवाल दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींविरुध्द संपूर्ण खोटी तक्रार दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

**(प्रस्तुत खटलयातील मुद्देमाल पुन्हा कागदात गुंडाळून ठेवण्यात आला.)**

स.सा.वा.दा.ब.अ.क.केले.

माझे समक्ष,

SHIVAJI N THAPEKAR
Digitally signed by SHIVAJI N THAPEKAR
Date: 2026.01.14 10:19:07 +0530

(एस.एन.थापेकर)

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कर्जत.

दिनांकः १४/०१/२०२६.

सदर जबाब मी टंकलिखित केला.

(व्ही.जी.घोगरे)

लघुलेखक,